Annexure XXXVIII(1),(Vide Article-38.08)

**शासकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी पुरविण्यात येणाऱ्या वृत्तपत्रे, नियतकालिके यासाठी वर्तमानपत्र भत्ता देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक : विअप्र-१०.०५/प्र.क्र.१६/०५/विनियम**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : १४ जुलै, २००५**

**वाचा :-**१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र-१०९१/प्र.क्र.४५/९२/विनिमय, दिनांक ११.६.१९९२
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र-१०००/प्र.क्र.४६/२००१/विनिमय, दिनांक११.७.२००१
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र-१०.०३/प्र.क्र.४४/०३/विनिमय, दिनांक ५.४.२००४

**प्रस्तावना -** शासकीय खर्चाने निवासस्थानी वृत्तपत्रे पुरविण्याची सवलत असलेल्या अधिकाऱ्यांना त्याबाबतची पावती (Cash Memo) सादर केल्यानंतर त्याबाबतच्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळते. अधिकाऱ्याने वृत्तपत्राच्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी वृत्तपत्राच्या देयकाची पावती कार्यालयाला सादर केल्यानंतर त्याबाबतचे देयक तयार करुन ते अधिदान व लेखा अधिकाऱ्याकडून मंजूर झाल्यानंतर सदर खर्चाची प्रतिपूर्ती अधिकाऱ्यास देण्यात येते; त्यामुळे सदर कार्यवाहीत बराच कालापव्यय होतो. तसेच त्यासाठी नेमावा लागणारा कर्मचारी वृंद आणि त्यासाठी वापरावी लागणारी लेखनसामुग्री यावर देखील खर्च होतो. त्यामुळे सदर बाबींवर होणारा खर्च व कालापव्यय टाळण्यासाठी निवासस्थानी वृत्तपत्रे अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांना एक ठोक रक्कम दरमहा वृत्तपत्र भत्ता म्हणून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावावर सांगोपांग विचारविनिमय करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे -

**<u>शासन निर्णय</u>**

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र-१०००/प्र.क्र.४६/२००१/विनियम, दिनांक ११.७.२००१ ला जोडलेल्या विवरणपत्रातील भाग- पहिला, उप विभाग-दोन, अनुक्रमांक - ४३, नियम - १४० समोरील रकाना क्रमांक - ६ मधील अट क्रमांक - ४ तसेच शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र-१०.९२/प्र.क्र.४५/९२/विनियम, दिनांक ११.६.९२ व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र-१०.०३/प्र.क्र.४४/०३/विनिमय, दिनांक ५.४.२००४ या अन्वये रद्द करुन शासकीय खर्चाने निवासस्थानी वृत्तपत्र पुरविण्याची सवलत असलेल्या खालील अधिकाऱ्यांना सोबत जोडलेल्या प्रमाणपत्राच्या (जोडपत्र-अ) आधारे एक ठोक रक्कम दरमहा वृत्तपत्र भत्ता म्हणून देण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| | | |
|---|---|---|
| **१)** | **मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव व सचिव** | **रु.६००/- दरमहा** |
| **२)** | **विभाग प्रमुख आणि मंत्रालयीन विभागातील उप सचिव व त्यांच्या वरील दर्जाचे इतर कार्यालयातील अधिकारी** | **रु.२५०/-दरमहा** |

**२. शासकीय खर्चाने निवासस्थानी वृत्तपत्रे पुरविण्याची सवलत असलेल्या अधिकाऱ्यांना निवासस्थानी वृत्तपत्राऐवजी वृत्तपत्र भत्ता म्हणून ठोक रक्कम खालील अटींच्या अधिन अनुज्ञेय राहील :-**

१) अर्जित रजा, वैद्यकीय कारणास्तव परिवर्तित रजा, अर्ध वेतनी किंवा शैक्षणिक रजा इत्यादीसाठी १० दिवस किंवा जास्त रजेच्या कालावधीत वृत्तपत्र भत्ता अनुज्ञेय होणार नाही.

२) अधिकाऱ्यास एखाद्या महिन्यात त्याला अनुज्ञेय असलेल्या मासिक वृत्तपत्र भत्त्यापेक्षा कमी किंवा जास्त किंमतीची वर्तमानपत्रे / नियतकालिके खरेदी करण्याची मुभा राहील. तथापि त्यामुळे त्यांना अनुज्ञेय असलेल्या सरासरी मासिक वर्तमानपत्र भत्त्यानुसार देय होणाऱ्या वार्षिक रक्कमेच्या एकूण मर्यादेत वाढ होणार नाही.

३) वर्षभरात निवासस्थानी घेतलेल्या वृत्तपत्रे / नियतकालिके यासाठी झालेला खर्च अधिकाऱ्यास अनुज्ञेय असलेल्या एकूण वार्षिक रक्कमेच्या मर्यादेपेक्षा कमी झाल्यास उरलेल्या रक्कमेतून त्याच्या कार्यालयीन उपयोगासाठी पुस्तके किंवा संदर्भ ग्रंथ खरेदी करण्याची अनुमती देण्यात यावी.

४) निवासस्थानी वृत्तपत्रे अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेला वृत्तपत्र भत्ता मिळण्यासाठी दरमहा सोबत जोडलेल्या जोडपत्र - अ च्या नमून्यात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५) याबाबतचा खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६) शासकीय खर्चाने निवासस्थानी वृत्तपत्रे अनुज्ञेय असलेल्या अधिकाऱ्यांना ठोक दराने अनुज्ञेय वृत्तपत्र भत्ता मंजूर करण्याचे पूर्ण अधिकार विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख यांना राहतील.

७) विभाग प्रमुखांना त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील प्रशासन / लेखा विषयक कार्यभार सांभाळणाऱ्या राजपत्रित अधिकाऱ्याला हे अधिकार पुर्नप्रदान करता येतील.

८) अधिकाऱ्याने निवासस्थानी घेतलेल्या वृत्तपत्राची रद्दी विकणे व अशा विक्रीतून येणारे उत्पन्न शासकीय लेख्यामध्ये जमा करणे आवश्यक राहणार नाही.

ही सवलत या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( न.सु.पाथरे )**
**कार्यासन अधिकारी, वित्त विभाग**

**प्रति,**

* १. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई ४०० ०२०

* २. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०

* ३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर

* ४. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

राज्यपालांचे सचिव

* १९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

* २०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मादाम कामा रोड, मुंबई

* २१. प्रमुख न्यायाधीश, कुटुंब न्यायालय, नागपूर/मुंबई, वांद्रे, मुंबई ४०० ०५१

२२. उप संचालक, लेखा व कोषागारे, कोकण विभाग,कोकण भवन, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती

५. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
६. उप मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय
८. सहाय्यक
मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे
९. अतिरिक्त मुख्य सचिव /प्रधान सचिव/
सचिव
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे(पूर्व),
१०. मुंबई ४०० ०५१
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१३. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी
१४. लेखा, कोकणभवन, नवी मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),
* १५. मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील
* १६. शाखा), मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय
* १७. न्यायाधिकरण, कुटीर क्र.३ व ४,
अधिदान व लेखा कार्यालय आवार,
मुंबई
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ
* १८. सचिवालय, मुंबई

२३. उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी
लेखा,कोकण विभाग, नवी मुंबई/ पुणे/ नागपूर/
औरंगाबाद/नाशिक/ अमरावती
२४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२५. सर्व उप कोषागार अधिकारी
२६. मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणा
खालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख
आणि कार्यालय प्रमुख
२७. सर्व विभागीय आयुक्त
२९. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३०. सर्व जिल्हाधिकारी
३१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
३२. सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्य लेखा व
वित्त अधिकारी
३३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी
दिल्ली ११० ००१
३४. संचालक (माहिती), महाराष्ट्र परिचय केंद्र, अ-८, स्टेट
३५. एम्पोरिया इमारत, बाबा खरकसिंग मार्ग, नवी
दिल्ली ११०००१
३६. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३७. निवड नस्ती, कार्यासन - विनियम, वित्त विभाग

* पत्राद्वारे.

**शासकीय अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी पुरविण्यात येणाऱ्या वृत्तपत्रे, नियतकालिके यासाठी**
**वर्तमानपत्र भत्ता प्रित्यर्थ मिळणाऱ्या प्रतिपूर्तीची मागणी व त्याबाबतचे प्रमाणपत्र**

***जोडपत्र - अ***

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र - १०.०५/प्र.क्र.१६/२००५/विनियम, दिनांक १४ जुलै २००५ अनुसार खालील कालावधीसाठी अनुज्ञेय असलेल्या वर्तमान पत्राच्या भत्त्याची प्रतिपूर्ती मला देण्यात यावी.

| कालावधी | एकूण दिवस |
| --- | --- |
| | |

मी प्रमाणित करतो / करते की, अनुज्ञेय नसलेला १० दिवस किंवा त्यापेक्षा जास्त असलेला रजेचा कालावधी, पदग्रहण अवधी, प्रतिनियुक्तीचा कालावधी , प्रशिक्षण कालावधी, सक्तीचा प्रतिक्षा कालावधी किंवा इतर कालावधी वरील कालावधीत समाविष्ट नाही.

दिनांक :- अधिकाऱ्याची स्वाक्षरी :-

( नाव व पदनाम )

कार्यालयाचा संपूर्ण पत्ता :-

प्रमाणित करण्यात येणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी :-

( नाव व पदनाम )

कार्यालयीन शिक्का

1 726 (12,500+15-7-05)-3